**इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी.**
**महिला व बालविकास विभाग**
**अंदाजपत्रकाकरीता दरपत्रक नोटीस**

इचलकरंजी महानगरपालिका महिला व बालविकास विभागांतर्गत महिलांना रोजगार / स्वायंरोजगार उपलब्ध करुन देवून आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी करणेच्या उद्देशाने शहरातील मुलींना व महिलांना टॅली प्राईम (TALLY PRIME) चे प्रशिक्षण देणे कामी निविदा मागविणेत येणार आहे. याकामी अंदाजपत्रक करणेकरीता दरपत्रक / कोटेशन मागविणेत येत आहे. सदर दरपत्रक / कोटेशन बंद लिफाफ्यामध्ये दिनांक 11 / 10 /2025 ते दि. 15 / 10 /2025 अखेर पर्यंत कार्यालयीन वेळेत महानगरपालिकेच्या बारनिशी विभागात स्विकारणेत येईल. प्राप्त दरपत्रक / कोटेशन दि. 16 / 10 / 2025 रोजी स.11.00 वाजता उघडणेत येईल. याबाबतची सर्व अटी महिला व बालविकास विभागाकडे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

सही/-
उपायुक्त
इचलकरंजी महानगरपालिका

---

**इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी.**
**महिला व बालविकास विभाग**

महिलांना रोजगार / स्वयंरोजगार उपलब्ध करुन देऊन आर्थिक दृष्टया स्वावलंबी होणेच्य दृष्टीने शहरातील महिला व मुलींना प्रशिक्षण देणे.

अटी / शर्ती-

1. खालील दोन्ही प्रशिक्षणचे दरपत्रक देणे आवश्यक.

| अ.क्र. | प्रशिक्षण तपशिल |
|---|---|
| 1 | टॅली प्राईम बेसिक |
| 2 | टॅली प्राईम ॲडव्हान्स |

2. प्रशिक्षणाचा कालावधी, प्रशिक्षण प्रति दिन किती तास असेल याची सविस्तर माहिती देणे.
3. प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम सोबत देणे बंधनकारक राहील.
4. प्रशिक्षणामध्ये लाभार्थी संख्या 120 इतकी असेल.
5. प्राप्त दरपत्रक मधील सर्वात कमी दराचे आधारे संबंधीत प्रशिक्षण कामाचे अंदाजपत्रक तयार करणेत येईल. तदनंतर निविदा प्रक्रिया राबविणेत येईल.
6. प्रशिक्षणसाठी आवश्यक साहित्य तसेच प्रशिक्षणाकरीता आवश्यक हॉल / गाळा हा निविदाधारकांना पुरवठा करणे बंधनकारक राहील.
7. सर्व दर GST व इतर सर्व शासकीय करासह देणेत यावे.
8. उक्त प्रशिक्षणाबाबत तांत्रिक बाबींचे मार्गदर्शन देणे आवश्यक आहे.
9. संबंधीत प्रशिक्षण पुर्ण झालेनंतर लाभार्थींना यांना प्रशिक्षण पुर्णत्वेबाबतचे प्रमाणपत्र संबंधीत निविदाधारक स्व:खर्चाने यांनी देणे बंधनकारक राहील.